
Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL




Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

# AJANTA

Ajanta Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३. आसाराम लोमटे यांच्या 'आलोक' कथासंग्रहाचे भाषिक विशेष

सखाराम शहादेव शिंदे
संशोधक विद्यार्थी.
डॉ. गणेश मोहीते
मार्गदर्शक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

प्रस्तावना

भाषाहे अभिव्यक्ती, संवाद, विचार आदान–प्रदानाचे माध्यम आहे. अक्षरे, चिन्हे, खुणा यांच्या सहाय्याने व्यक्त होणारी भाषा म्हणजे भाषेचे लखीत स्वरूप तर ध्वनि, उच्चार यांच्या रूपाने व्यक्त होणारी भाषा म्हणजेच मौखिक भाषा होय. मौखिक भाषा दोन स्वरूपात प्रकटते–प्रमाण भाषा आणि बोली भाषा.

एका विस्तृत प्रदेशात बोलली जाणारी, अनेक बोली – भेदांना व स्थानिक भेदांना समाविष्ट करून घेणारी, राजकारण, संस्कृती व शिक्षण या क्षेत्रामध्ये वापरली जाणारी आणि समाजाकडून लेखन व्यवहारासाठी स्वीकारली गेलेली भाषा म्हणजे प्रमाणभाषा होय. उदा. मराठी, हिंदी.

बोलीभाषा–भाषा उच्चारणाची विशिष्ट लकब किंवा पध्दती म्हणजे बोली भाषा होय. बदलत्या काळानुसार प्रदेशानुसार एकाच भाषेची भिन्न रूपे विकसित होऊन बोलींचा जन्म होतो.

प्रमाण भाषेशी कमी जास्त प्रमाणात भाषा भेद करून भाषा उच्चारणाचा ढंग म्हणजे बोली असेही म्हणता येईल. समाजातील दैनंदिन भाषा व्यवहार प्रत्यक्षात बोलीं मधूनच अधिक प्रमाणात होतात.

मराठीत यादव काळापासून बोली अस्तित्वात आहेत. चक्रधरांच्या लीळा चरित्रात विदर्भातील बोली आहेत तर ज्ञानेश्वर नामदेवांच्या साहित्यांमध्ये नगर नेवासेची बोलीरूपे दिसून येतात. बोलींचे प्रभाव, कार्यक्षेत्र हे मर्यादित समाज मनाशी संबंधित असते. मर्यादित प्रदेशातील विशिष्ट जाती व्यवस्था राजकीय संस्था, लिंग, वयोगट यानूसारही प्रत्येक गटाची भिन्न अशी बोली निर्माण होते.

महाराष्ट्रात मराठी भाषेच्या बोली दरबारा कोसांवर बदलतात असे म्हणतात. त्यानुसार मराठीच्या अहिराणी, वऱ्हाडी, मराठवाडी, कोकणी, नागपुरी, पुणेरी, कोल्हापुरी यासारख्या बोली आढळून येतात. बोली ह्या त्यांच्यातील उच्चार, शब्दविकार, वाक्यविचार आणि शब्दसंग्रह यानुसार वेगवेगळ्या ठरतात. प्राचीन काळापासून मराठीमध्ये गद्य आणि पद्य स्वरूपात साहित्य रचना केलेली दिसून येते. सुरूवातीस म्हाइंभट यांनी "लीळाचरित्र" या ग्रंथात वऱ्हाडी बोलीचा वापर केला, तर मराठीतील पहिले काव्य म्हणजे महादंबेची "धवळे"हे ही बोली पासून अलिप्त नाही.

मराठवाडीबोली–औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर उस्मानाबादया जिल्हयांचा समावेश मराठवाडा या प्रादेशिक विभागात होतो. मराठवाडयातील बोलीला मराठवाडी बोली म्हणतात. बारा कोसावर भाषा बदलते या नियमानुसार मराठवाडयातील प्रत्येक जिल्हयात वैशिष्टयपूर्ण भिन्न मराठवाडी बोलीचा वापर केला जातो.

कथा साहित्यांमधील मराठवाडी बोली

मराठवाड्यातील ग्रामीण कथाकारांनी मराठवाडी बोलीचा वापर करून संपन्न कथा भांडार निर्माण केले आहे. मराठवाड्यातील ग्रामीण कथेला एक वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या कथाकारांमध्ये उत्तम बावस्कर, आनंद कदम, राजेंद्र गहाळ, नागनाथ पाटील, भास्कर बडे, भीमराव वाघचौरे, आसाराम लोमटे, मधु सावंत इत्यादी मंडळींचा समावेश होतो.श्या सर्व कथाकरांमध्ये आज घडीला ताकदीचे आणि महत्वाचे कथालेखक म्हणून आसाराम लोमटे यांचे नाव घेतले जाते. इडापीडा टळो (२००६), आणिआलोक (२०१३),इत्यादी कथा संग्रह प्रसिद्ध आहेत. प्रस्तुत निबंधात 'आलोक' कथासंग्रहाच्या भाषा शैलीचा विचार करण्यात आला आहे.

आसाराम लोमटे हे मराठवाड्यातील ग्रामीण जीवनातील वास्तव रेखाटणारे संवेदनशील कथाकार आहेत. त्यांच्या कथांमधून शेतकरी जीवनाची दशा आणि दिशा स्पष्टपणे जाणवते. त्यांच्या 'आलोक' या कथा संग्रहास साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. आलोक कथा संग्रहात आसाराम लोमटे यांनी नव्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण, निसर्ग, पाऊस, पाण्याचे वर्णन, खेडयापाडयांतील राजकारण यांचे वास्तव व संवेदनशील चित्रण केलेले आहे. आलोक मध्ये एकूण सहा कथा आहेत. कथांची भाषा ग्रामीण असून त्यांमध्ये मराठवाडी बोलीचा चपलख वापर दिसून येतो. 'चिरेबंद', 'ओझं', 'खुंदळण', 'कुभांड', 'जीत'आणि'वळण' या कथांच्या माध्यमातून मराठवाडी बोलीच्या सहाय्याने आसाराम लोमटे ग्रामीण जीवनातील संघर्ष, नातेसंबंध, मानवी जीवनाचे कंगोरे उलगडून दाखवतात.

'चिरेबंद' या कथेमध्ये हैद्राबाद मुक्तीसंग्रमात हुतात्मा बनल्याची नोंद असलेल्या आजोबांचा सन्मान स्वीकारण्यासाठी आलेल्या शहरी नातवाला आजोबाच्या कर्तृत्त्वाचे दर्शन घडविणारी आहे चिरेबंद कथेमधील मराठवाडी बोलीतील एक नमुना पाहा.

"आभाळातून कणी कोंडा गळत राहावा तशी पावसाची भुरभूर सुरूच! थोडा रस्ता सुकल की पावसाची रिपरिप. जखडून टाकल्यासारख घरात किती वेळ बसणार ?"[१] वाटेत एक दोघांनी गडयाला विचारलं, 'कोणहे ?' गडयानं सांगितलं, 'हे पंतांचे नातू' त्यानंतर विचारणाऱ्याच्या नजरेत डूख दिसली. 'आता हे वारस समजा ओसाड जहागिरीचे!' असंतो म्हणाला. "कशाल येतोस बाबा इकडं, नुस्ता फुपाटाय... सगळ्या आयुष्याची पायपोळ व्हायची."२ मराठवाडी बोलीचे प्रत्ययकारी चित्रण या संवदातून घडते.

ब्राम्हण कुटूंबातील पंताची बायको पंताच्या हात्ये नंतर एकटी चिरेबंद वाडयात राहून सर्व संकटांचा धीटाईने सामना करते याचे चित्रण चिरेबंद कथेत आले आहे.

'ओझं' ही निवेदनात्मक संवाद पद्धतीने लिहिली आहे. शेतकरी असणाऱ्या मोठया भावाच्या आत्महात्या नंतर प्राध्यापक भावाने त्याच्या शीकेलेला संवाद या कथेमध्ये आहे. वाचकाला उद्धव स्ततेचा अनुभव या कथेतून येतो.लेखकाने हादरवून टाकणाऱ्या प्रतिमांचा वापर या कथेत केला आहे. ही एक भाषिक प्रतिमा पाहा 'कलकलत्या उन्हात सावली घेऊन आलेल्या ढगानं निघून जाव अन् उभ्या जन्माचीच दुपार व्हावी तसं तिचं झालंय.' निवडूंगातून वाट काढण्याची तिची धडपड चाललेली. धारात वाहून जाण्याची वेळ आली असतानाही काठावर येण्यासाठी तिचा आटापिटा. तू गेल्यानंतर तिला जन्रा पांगल्यासारखं झालं. वैशाखातल्या उन्हानं आयुष्यभरासाठी पाल ठोकलं"३ . मोठया भावाच्या व्यसनाने वहिनीच्या मनाच्या आवस्था संदर्भात

लेखक लिहीतात "आधी वाटायच लांबूनलांबून धूर दिसतोय. पण आता पाया खालीच विस्तव आल्यासारखं जाणवायला लागल."४ अशा पद्धतीने भाषिक प्रतिमा वापरून लेखक मानवी वर्तनाचे सुचन करतो.

**'खुंदळण'** ही डाव्या चळवळीतून, प्रस्थापित राजकिय प्रवाहात आलेल्या दत्तराव या कार्यकर्त्यांच्या घुसमटीची कथा आहे."लहानपणी कंदुरील कुठं जेवायला गेलं की वाढया परातील रस्सा वाढायचा. मटणाचे चार – दोन खडे त्याच्या भगुंनयाच्या तोंडाला आले की भगुनं मागं करायचा. ओतता—ओतता काठाला आलेले खडे पुन्हा मागं जाईत.वाढायला पुन्हा त्यानं भगुनं घेऊन खाली वाकला की तिखट जाळरस्साच परातीत यायचा. कधीकधी वाटतं हेच  सोडून द्याव अन् नीट कामधंद्या लाला गावपण ह्यो उष्टानाद सुटत नाही."५ दत्तरावाची दोलायमान मानसिकता बोलीतील श्शब्दकलेच्या माध्यमातून व्यक्त होते.

**'कुभांड'** कथेत मध्यमवयीन मालीपाटलाचा जगण्याचा, तगून राहाण्याचा आटापिटा कथेला व्यापून टाकतो. व्यक्ती—व्यक्ती मधील अस्तित्व टिकवण्याच्या चढाओढीचा निकराचा प्रयत्न, त्यातून माली पाटलाच घुसळून निघणे. परंतू शेवटी वर्चस्ववादी कुभांड करण्यात पाटील कसा यशस्वी होतो याच चित्रण म्हणजे कुभांडहोय. गावातल्या राजकारणातून परस्परांचा काटा काढण्यासाठी सामान्य माणसाचा वापर कसा केला जातो याचे दर्शन कुभांड कथेत घडते. कुभांड कथेतील "काल दिवस मावळायच्या टायमाला मळयात बुधवाडयातील एक पोरंग आल होतं."६ या वाक्यावरून मराठीवाडी बोलीत इंग्रजीचा वापर असल्याचे दिसून येते. भाजीसाठी वापरलेला 'खळबट' शब्द मराठवाडी बोलीची प्रचिती देतो. रिकाम टेकडया अंक्याच वर्णन करताना मराठवाडी बोलीच रूप पाहू "ते मोकारयं. रिकामं हिंडतंय त्या अनंदा संग, मायेचे टुकार झाले."७

**'जीत'** ही राजकारणाची पार्श्वभूमी असलेली कथा आहे. ग्रामपंचायत सदस्याच्या मृत्युनंतरच्या पोटनिवडणुकीच्या निमित्ताने घडणाऱ्या अंतरंगाचा वेध जीत कथा घेते. कथेतील सरपंच एका वारकऱ्याला उभे करून आपल्या इमानदारीच्या जोरावर मेंमबर निवडून आणण्याचा प्रयत्न करतो. परंतु गावातील सभापती, लोकांच्या सहानुभूतीचा जोरावर मृत हरीच्या बायकोला निवडून आणतो. निवडणूकीला उभे करण्यासाठी सभापती जेंव्हा हरीच्या बायकोलासमजावतो तेंव्हा ती म्हणते"हे पाहा भाऊ, ते गेले तसे अन्न पाण्यावरची वासना उडालीय आमची, मायलेकरांचा घास तोंडातल्या तोंडात घोळतो, पाण्यासंग गिळावा लागतो. आता पुन्हा त्याच धारात कशाला वाहात जायचं ?"८ यामध्ये मराठवाडी बोलीच ामोठया खुबीन वापर केलेला.आहे.

**'वळण'** ही आठव्या इयत्तेत शिकणाऱ्या पगण या शाळकरी मुलीची कथा आहे. पगण ही शेळ्या सांभाळणाऱ्या वडीलाची शिक्षणाची ओढ असणारी, शिक्षणामुळे आपले भाग्य बदलणार असा समज असणारी स्कॉलरशीप धारक मुलगी आहे. एके दिवशी प्रयाग, शाळेच्या वाटेवर घडलेल्या खुनाची साक्षीदार बनते आणि तिच्यासह कुटुंबाच ही स्वास्थ हरवून जातं. प्रयागच्या शिक्षणाच्या मार्गात आडथळे येतात अन तिची शाळाच बंद होण्याची वेळ येते. तिची शाळा सुरू राहण्यासाठी शिक्षक व वडील यांनी केलेल्या प्रयत्नाचे चित्रण वळण कथा करते.

"काही तरी झटापट झाली असंल, पण तू काय भेऊ नको. दुसरं म्हणजी रोज शाळेत जातांना वाडीतून कोणी सोबत आसलं तरच जायचं"९ असा धीरवडीलप गणला देतात.

"लेकरू जिनस साहेब ते अशा मामलयात शहाणी सुरती माणसं गडबडतात, तिथं ही पोरगी काय बोलणार? अन् कोणाचं म्हणून नाव सांगणार?"१० असा सवालही वडील हेडमास्तरांना करतात. प्रयाग

म्हणजेच पगनचे गुरूजी मनातल्या मनात विचार करतात, "खेड्यातल्या पोरींच आयुष्य म्हणजे चिखलाचा डेग. एकदा त्यात फसल्यावर वर निघण्यासाठी धडपड करायची तर माणूस अधिकच खोल गाळात जातं"११ या मधील डेरा म्हणेजच रुपक वापरुन लेखक हे मराठवाडी बोलीतून गुरुजींचे चिंतन व्यक्त करतात.

सारांश

'आलोक' कथासंग्रहामध्ये असारामलोमटे यांनी परभणी जिल्ह्यातील मराठवाडी बोलीचा वापर केलेला आहे.आलोक मधील बोलीवर उर्दू, हिंदी, इंग्रजी, भाषेचा प्रभाव दिसून येतो. आलोकची भाषा आकलनास सोपी आहे. आलोक मधील बोली ही रसरशीत आणि विशिष्ट हे असलेली जनगानसाची दैनंदिन वापराती लवचिक बोली आहे. लोकोक्तिंचा समयोचित, संवेदनशिल वापर आलोक मध्ये कलेला आहे. बोलीच्या वापराने आलोक मधून मानवी मनाची घुसमट लेखकांचे व्यक्त केली आहे. आलोक मधील प्रत्येक कथेची मांडणी, त्यातील बोली, प्रसंग वर्णन वाचकाला गुंग करून टाकते. खेड्यापाड्यातील कथा, व्यथा काळजाला भिडणाऱ्या शब्दातील बोलीतुन आलोक मध्ये आलेल्या आहेत.

संदर्भ

१ आलोक—पृष्ठ क्रमांक९ ,
२ आलोक—पृष्ठ क्रमांक ११,
३ आलोक—पृष्ठ क्रमांक५३,
४ आलोक—पृष्ठ क्रमांक४५,
५ आलोक—पृष्ठ क्रमांक६१,
६ आलोक—पृष्ठ क्रमांक८१,
७ आलोक—पृष्ठ क्रमांक९३,
८ आलोक—पृष्ठ क्रमांक११५,
९ आलोक—पृष्ठ क्रमांक १३५,
१० आलोक—पृष्ठ क्रमांक १३९,
११ आलोक—पृष्ठ क्रमांक १५०.

संदर्भसाहीत्य

१ आलोक—आसारामलोमटे— 'शब्दप्रकाशन .
२ मराठीभाषाउदगम व विकास— कृ.पा.कुलकर्णी—मेहतापब्लिशिंगहाऊस.